# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४४** **दि. २१/१२/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२१/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील चंद्रशेखर शिवाजी | महाजन सुनिल सुपडु |
| नेरकर सरीता अनंत | कापसे मयुर चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे प्रतिभा चंद्रकांत | बालाणी भगतराम रावलमल |
| सोनवणे कांचन विकास | देशमुख प्रतिभा गजानन | अत्तरदे रजनी प्रकाश |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुंडलिक | काळे रेश्मा कुंदन |
| शिंदे गायत्री उत्तम | सोनवणे सुरेश माणिक | आहुजा मनोज नारायणदास |
| कोळी दत्तात्रय देवराम | बारी शोभा दिनकर | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरिफ | सोनार रंजना विजय |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे ललित विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| भंगाळे विष्णु रामदास | बरडे नितीन मनोहर | देशमुख सुन्नाबी राजु |
| तायडे ज्योती शरद | बेंडाळे उज्वला मोहन | शेख सैईदा युसुफ |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | राणे गायत्री इंद्रजित | पटेल इब्राहिम मुसा |
| काळे अमित पांडुरंग | जोशी अनंत हरिश्चंद्र | निता मंगलसिंग सोनवणे |
| चौधरी मंगला संजय | तायडे सुरेखा नितीन | सोनवणे विक्रम किसन |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | चव्हाण ज्योती बाळासाहेब | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| सोनवणे धीरज मुरलीधर | मराठे जितेंद्र भगवान | **स्विकृत सदस्य** |
| भोळे सिमा सुरेश | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | कैलास नारायण सोनवणे |
| काळे दिपमाला मनोज | पाटील रेखा चुडामण | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे सुरेखा सुदाम | राजेंद्र नारायण मराठे |
| पाटील सचिन भिमराव | ढेकळे सदाशिव गणपत | |
| पाटील प्रतिभा सुधीर | पाटील राजेंद्र झिपरु | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.देविदास पवार, अति.आयुक्त तथा सहा.संचालक, नगररचनाकार श्री.के.पी.बागुल, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त तथा मुख्यलेखाधिकारी, श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** सभा कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या सोनवणे भारती कैलास २) सोनवणे राखी शामकांत ३) श्री. महेश रतन चौधरी ४) श्री. बाविस्कर किशोर रमेश यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९४५ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | जयश्री सुनिल महाजन<br>मा.महापौर | १) श्री.मनोज सुरेश चौधरी, सन्मा.सदस्य यांचे वडील स्व.कै.सुरेश नारायण चौधरी २) श्री.बाळासाहेब लासुरे, फोरमन यांचे वडील स्व.कै.रामभाऊ खंडुजी लासुरे(सेवानिवृत्त केंद्रप्रमुख, जि.प.जालना) ३) शहरातील जेष्ठ पत्रकार स्व.चंदुलाल देविदास नेवे वय ६६ वर्ष पत्ता प्लॉट नं.४/२ अरिहंत कॉलनी, नानीबाई कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | कुलभुषण विरभान पाटील<br>मा.उपमहापौर | श्री.मनोज सुरेश चौधरी, सन्मा.सदस्य यांचे वडील स्व.कै.सुरेश नारायण चौधरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | ललित विजयराव कोल्हे | श्री.बाळासाहेब लासुरे, फोरमन यांचे वडील स्व.कै.रामभाऊ खंडुजी लासुरे(सेवानिवृत्त केंद्रप्रमुख, जि.प.जालना) यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | सिमा सुरेश भोळे | १) मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांचे मेव्हणे कै.अशोक विठ्ठलराव पाटील २) श्री.मोहनजी वर्धे साहेब(उपायुक्त, राज्य उत्पाद शुल्क विभाग, नागपुर) यांचे वडील कै.सुकलालजी वर्धे ३) नगरसेवक श्री.मनोज सुरेश चौधरी यांचे वडील कै.सुरेश चौधरी ४) मा.नगरसेवक श्री.विठ्ठल एकनाथ कोल्हे यांचे पुतणे कै.हितेन शरद कोल्हे ५) श्री.संतोष महीपत इंगळे (उद्योगपती, अयोध्यागर) यांच्या मातोश्री कै.अनुसयाबाई इंगळे ६) जुने जळगांव येथील श्री.लिलाधर माधव खडके यांचे चिरंजीव कै.चेतन लिलाधर खडके ७) जुने जळगांव येथील श्री.पद्माकर गणपत खडके यांच्या मातोश्री कै.सुशीलाबाई गणपत खडके ८) जुने जळगांव येथील श्री.किशोर एकनाथ झोपे यांचे लहान बंधु कै.गोपाल एकनाथ झोपे ९) शिव कॉलनी येथील रहिवासी श्री.सुधाकर कापुरे यांच्या मातोश्री कै.विमलबाई कापुरे १०) मनपा स्वच्छता कर्मचारी रेखाबाई सुभाष बोदडे यांची कन्या कै.ममता सुभाष बोदडे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | डॉ.विश्वनाथ सुरेश खडके | १) मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांचे मेव्हणे कै.अशोक विठ्ठलराव पाटील २) नगरसेवक श्री.मनोज सुरेश चौधरी यांचे वडील कै.सुरेश चौधरी ३) मा.नगरसेवक श्री.विठ्ठल एकनाथ कोल्हे यांचे पुतणे कै.हितेन शरद कोल्हे ४)श्री.संतोष महीपत इंगळे (उद्योगपती, अयोध्यागर) यांच्या मातोश्री कै.अनुसयाबाई इंगळे ५)जुने जळगांव येथील श्री.लिलाधर माधव खडके यांचे चिरंजीव कै.चेतन लिलाधर खडके ६) जुने |

| | | |
|---|---|---|
| | | जळगांव येथील श्री.पद्माकर गणपत खडके यांच्या मातोश्री कै.सुशीलाबाई गणपत खडके ७) जुने जळगांव येथील श्री.किशोर एकनाथ झोपे यांचे लहान बंधु कै.गोपाल एकनाथ झोपे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ६. | रेश्मा कुंदन काळे | श्री.मनोज सुरेश चौधरी, सन्मा.सदस्य यांचे वडील स्व.कै.सुरेश नारायण चौधरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९४६ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सिमा सुरेश भोळे | १) मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांची जिल्हा दुध उत्पादक संघ, जळगांव येथे संचालक पदी निवड झाल्याबद्दल २) मंत्री मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील यांची जिल्हा दुध उत्पादक संघ, जळगांव येथे संचालक पदी निवड झाल्याबद्दल ३) आमदार मंगेश रमेश चव्हाण यांची जिल्हा दुध उत्पादक संघ, जळगांव येथे चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल ४) जिल्हा दुध उत्पादक संघ, जळगांव येथे निवडुन आलेल्या सर्व संचालक मंडळाचे ५) जळगांव शहर महानगरपालिका येथील पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी श्री.नितीन सुरेश चौधरी यांचे चिरंजीव समीर चौधरी यांची रंगोत्सव आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल व ६) श्री.पंकज भैय्या यांचा चिरंजीव देवेश पंकज भैय्या यांने राष्ट्रीय ज्युनियर सायन्स ऑलिम्पीयाड मध्ये सुवर्ण पदक घेतल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २. | सरीता अनंत नेरकर | जळगांव जिल्हा दुध उत्पादक संघ येथे मंगेश चव्हाण यांची चेअरमन पदी तसेच श्री.प्रमोद पांडुरंग पाटील यांची संचालक पदी निवड झाल्याबाबत हार्दीक अभिनंदन. |
| ३. | रेश्मा कुंदन काळे | १) श्री.प्रकाश सोनवणे यांची जळगांव शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.२ च्या प्रभाग अधिकारी पदी पदस्थापना झाल्याबद्दल २) मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील, मा.ना. श्री.गिरीषभाऊ महाजन यांची जळगांव जिल्हा दुध संघात निवड झाल्याबद्दल तसेच सदर दुध संघाच्या चेअरमन पदी मा.ना.श्री.मंगेश चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ४. | डॉ.विश्वनाथ सुरेश खडके | १) मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांची जिल्हा दुध उत्पादक संघ, जळगांव येथे संचालक पदी निवड झाल्याबद्दल २) मंत्री मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील यांची जिल्हा दुध उत्पादक संघ, जळगांव येथे संचालक पदी निवड झाल्याबद्दल ३) आमदार मंगेश रमेश चव्हाण यांची जिल्हा दुध उत्पादक संघ, जळगांव येथे चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल ४) जिल्हा दुध उत्पादक संघ, जळगांव येथे निवडुन आलेल्या सर्व संचालक मंडळाचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील समाजसेवक यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**श्री.मयुर कापसे :-** महापौरताई मला बोलायचे आहे. महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** सर्वात आधी आपण विषयपत्रिकेवरील विषय घेऊ आणि त्याच्यानंतर चर्चा करु.

**श्री.मयुर कापसे :-** ताई प्लीज महत्वाचा विषय आहे.

**मा. महापौर :-** एक मिनीट मला सुचना करायची आहे मला सुचना करुन घेऊ द्या. त्यानंतर बरेच सन्मा.सदस्यांनी त्यांची जी कामे आहे ते आयत्यावेळेला घेण्यासंदर्भात मला विनंती केलेली होती. परंतु ती जवळ पास २५ कोटीच्या वर कामे आहे. ती येथे इनक्ल्युड करणे शक्य नाही. म्हणुन त्यासाठी आपण लवकरच महासभेचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी दोन दिवसात ज्या ज्या सन्मा.सदस्यांना आपली कामे द्यायची असतील त्यांनी दोन दिवसामध्ये महापौर कार्यालयाकडे कामे द्यायची आहे. प्रशासनाने सुध्दा जी कामे तुमचे पेन्डींग असतील काही प्रस्ताव अपुर्ण असतील तर ते अपुर्ण प्रस्ताव सुध्दा दोन दिवसात कंम्प्‍ लीट करुन सोमवार किंवा मंगळवार पर्यंत नगरसचिव साहेबांकडे द्यायचे आहे म्हणजे पुढची महासभा आपल्याला लवकरात लवकर काढता येईल.

**श्री.मयुर कापसे :-** ताई, मला एक विषय लक्षात आणुन द्यायचा आहे.

**मा.महापौर :-** एक मिनीट.

**नगरसचिव :-** यानंतर मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडुन शासन निर्णय क्र.जमपा-२०२१/प्र.क्र.१२७/नवि-२५ मंत्रालय, मुंबई दि.०१ डिसेंबर २०२२ चा शासन निर्णय प्राप्त झालेला आहे प्रशासनाकडे, त्यामध्ये त्यांनी जळगांव महानगरपालिकेने महासभेत पारित केलेले ठराव क्र.२४, दि.१७/०२/२००४, ठराव क्र.०३, दि.२९/०४/२००५ व ठराव क्र.३१, दि.२१/०५/२००८ प्रथमत: निलंबित करणेबाबत पत्र प्राप्त झालेले आहे. सदरच पत्र प्रशासनाने प्रभाग समिती खुला भुखंड संदर्भात हे ठराव असले कारणाने प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ते ४ यांच्याकडे पाठविण्यात आलेले असुन या आदेशाचे विरोधात संयुक्त अभिवेदन करावयाचे असल्यास या आदेशाच्या दिनांकापासुन तिस दिवसाच्या आत करता येईल. असे या पत्रात नमुद केलेले आहे.

**श्री.मयुर कापसे :-** गेल्या अनेक दिवसापासुन या ठिकाणी गैरप्रकार काही पदाधिकाऱ्यांच्या मार्फत याठिकाणी चालु आहे. ताई आपण बघतो की, एका सदस्याला मनपा फंडातुन काम करुन घेणेस किती मेहनत घ्यावी लागते. इव्हन मॅडम प्रेशर देतात तेव्हा कामे मंजुर व्हायचे. असेच काही कामे मी माझ्या प्रभागातले मंजुर करुन घेतलेले आहे. मॅडमांनी ते मंजुर केले, मी आपल्या अधिकाऱ्यांच्या मागे लागुन त्याच्या निविदा सुध्दा प्रसिध्द केले. निविदा प्रसिध्द केल्यानंतर सर्वात मोठी अडचण जी येते ती सर्वांना माहित आहे भाऊ की, मनपा फंडातुन ठेकेदार काम करायला तयार होत नाही. अशावेळेस मी पाच ते सहा ठेकेदारांसोबत बोलणी सुध्दा केली त्या पाच ते सहा ठेकेदारामधुन दोन तीन ठेकेदार ते टेन्डर भरण्यासाठी काम करण्यासाठी तयार सुध्दा झाले. जेव्हा ते संबंधीत ठेकेदार टेन्डर भरण्यासाठी महापालिकेत आले. तर महापालिकेच्या काही कर्मचाऱ्यांकडुन , काही अधिकाऱ्यांकडुन त्यांना सांगितले गेले की, आम्हाला काही पदाधिकाऱ्यांचे प्रेशर आहे की, मला विचारल्याशिवाय एक ही काम संबंधीत प्रभागाचे, मला विचारल्याशिवाय कोणतीही पावती कोणत्याही ठेकेदाराची फाडायची नाही. काय ही हुकुमशाही चालली आहे का महापालिकेत. का महापालिकेत प्रायव्हेट लिमिटेड कंपनी झाली आहे हा प्रश्न माझा या ठिकाणी आहे. ताई आपण संपुर्ण सभागृहात खुप जेष्ठ सभासद , सदस्य येथे बसलेले आहेत. आदरणीय सुरेशदादा जैन जेव्हापासुन नगराध्यक्ष होते तर आजपर्यंत तुम्ही या ठिकाणी महापौर आहे. या ठिकाणी आपले आदरणीय नितीनभाऊ लढ्ढा असतील, आदरणीय विष्णुभाऊ असतील. आमचे आदरणीय सिमाताई भोळे असतील, आदरणीय भारतीताई सोनवणे असतील,

आदरणीय अश्विनभाऊ सोनवणे आहे. अनेक लोकांनी या ठिकाणी पद भुषविलेले आहे. सत्तामध्ये ही त्याठिकाणी होते. पण कोणत्याही सदस्यानी असा गैरप्रकार असे गैरवर्तन कधीही केलेले नाही. पण सद्याच्या काळात आपण पाहतो. सत्ता ही स्वत:च्या फायद्यासाठी कशी होईल. आता हा सद्याचा प्रकार या ठिकाणी चालु आहे. महाभारतामधील एक छोटासा किस्सा मी तुम्हाला सांगतो, संपुर्ण सभागृहाला. जेव्हा हस्तीनापुरचे राज्य होते, जेव्हा विचीत्रवीर राजा मृत्यु पावले, तेव्हा ते सिंहासन हे खाली होते, ते सिंहासन खाली असतांना २०-२५ वर्षानंतर जेव्हा ते विचीत्र रविंद्रराजाचे मुलं मोठे झाले, त्या विचीत्रवीर राजाचे तीन मुले होते. एक पहिला होता धुतराष्ट्र जो नेत्रहिन होता, दुसरा जो होता राजा पांडु , आणि तिसरा होता राजा विर. तेव्हा होते भिष्मपितामह, म्हणजे आजच्या कन्डीशनला आपण काका म्हणतो ते होते त्यांचे भिष्मपितामह, जेव्हा ते सगळे सोबत बसले होते तर तेव्हा राज्य अभिषेक कोणाचा करायचा, हस्तीनापुराच्या सिंहासनावर कोणाला बसवायचे. हा मोठा पेच तेथे निर्माण झाला होता. तेव्हा सहाजीकच ते धुतराष्ट्र तेथे बोलुन गेले, ताई दोनच मिनीट.

**मा.महापौर :-** बोला , बोला.

**श्री.मयुर कापसे :-** धुतराष्ट्र त्या ठिकाणी बोलुन गेले. मी मोठा असल्यामुळे माझा लवकरात लवकर, कारण जो मोठा असतो त्याचा अधिकार असतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्या ठिकाणी विदुरासारखा लागतो. विदुर लागतो विदुर.

**श्री.मयुर कापसे :-** लवकरात लवकर माझा राज्य अभिषेक करा जेणे करुन सत्तेचा उपयोग मला घेता येईल. माझ्या प्रमाणे राज्य मी करेल. माझ्या मनाप्रमाणे प्रजेला मी ठेवेल. हे कोण बोलतो, धुतराष्ट्र बोलतो. हे सगळे संभाषण झाल्यानंतर भिष्मपितामह त्यांना थांबवतात आणि म्हणतात की, सत्ता ही उपभोगण्यासाठी नसते, सत्ता ही उपभोगण्यासाठी नसते तर सत्ता ही सेवेसाठी असते. सत्ता ही लोकहितासाठी असते, सत्ता ही जनहिताच्या कल्याणासाठी असते. आणि आपण आज काय पाहतो. तेव्हा ते धुतराष्ट्र होते नेत्रहिन होते. आजही भाऊ आपल्या महापालिकेत असे धुतराष्ट्र आहेत. फरक फक्त ऐवढा आहे की तेव्हाचे धुतराष्ट्र हे नेत्रहिन होते. आताचे धुतराष्ट्र हे डोळे असुन सत्तेच्या लोभापाई, पदापाई हे दृष्टहिन झालेले आहे. आणि अश्या पदाधिकाऱ्यांचे नांव सोनगीरे साहेब तुम्ही येथे डिक्लेअर करा. आता माझ्याकडे ऑडिओ क्लिप आहे मी तुम्हाला ऐकवेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, मला बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई मला बोलायचे आहे.

**श्री.मयुर कापसे :-** साहेब तुम्हाला पुर्ण विषय माहित आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणीही पदाधिकारी झाल्यावर महापौर असो, उपमहापौर असो, तो विरोधी पक्षनेता असो, तो सभागृहनेता असो, महिला व बालकल्याण सभापती असो किंवा स्थायी समिती सभापती असो. कोणीही या ठिकाणी पदावर बसला तर त्याचे बापाचे नाव महापालिकेच्या ७/१२ च्या उताऱ्यावर काही लागत नाही. हे फक्त जेवढी आपली टर्म आहे तेवढे पुरता आपण काम करायचे. अश्या बोगसगीरीने, दादागीरीने काम करायलाच नाही पाहिजे. तुझ्याकडे रिकॉर्डींग असेल तर ऐकव तु.

**श्री.मयुर कापसे :-** साहेब तुम्ही सांगत आहे की, मी नाव सांगु.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.कैलास सोनवणे :-** सांगावे नाव प्रशासनाने.

**श्री.मयुर कापसे :-** साहेब मी तुमच्यापर्यंत ही आलो होतो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, आता महासभेत जे चालले आहे, मयुरदादा जे बोलले ते सत्य आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगीरे, शहर अभियंता :-** यापुर्वी आपले सभागृहातील सन्मा.सदस्य आबा कापसे यांचा मला फोन आलेला, त्यांनी सांगितले की, आमचे काही ठेकेदार त्या ठिकाणी पावती फाडायला आलेले आहे. आणि त्यांना पावती फाडायला मज्जाव करत आहे. तेथे कोणी लिपीक आहे त्यानी पावती फाडण्यापुर्वी त्यांना काही तरी सांगितले की, मी त्यांना कस सांगितले की, कॉन्ट्रॅक्टरला माझ्याकडे पाठवा, कोण पावती फाडत नाही. माझ्याकडे राईटींग मध्ये तक्रार द्या. मी ऍक्शन घेईल. आणि कोणत्याही ठेकेदाराला कुठल्याही कामासाठी पावती फाडायला कुठलेही बंधन नाही. कालही नव्हते, आजही नाही, पुढेही राहणार नाही.

**श्री. मयुर कापसे :-** साहेब प्रश्न तो नाहीये प्रश्न एवढाच आहे की पदाधिकाऱ्यांचा दबाव आहे की नाही ?

**श्री. विशाल त्रिपाठी** :- कोण लिपीक आहे त्याला बोलवा येथे

**श्री. जितेंद्र मराठे** :- कोण आहे त्याला बोलवा येथे

**मा.महापौर** :- कोणत्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना फोन करून सांगीतले आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. जितेंद्र मराठे** :- कोण आहे त्याला बोलवा .

**श्री. विशाल त्रिपाठी** :- कोण लिपीक आहे त्याला बोलवा येथे

**श्री. चेतन सनकत** :- एक मिनिंट तुमच म्हणण अस आहे का की हे खोट बोलताय?

**श्री. अश्विन सोनवणे** :- कोणता लिपीक आहे त्याला बोलवा.

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- तो जो लिपीक आहे. त्याला काही काम होते तर तो गेला आहे सुटीवर

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. जितेंद्र मराठे** :- ऑडीओ ऐकवतो आम्ही येथे , एकच मिनिंट

**मा.महापौर :-** सर्वांनी शांत बसायचे आहे. एक एक जण बोला.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- कोण पदाधिकारी आहे, प्रशासनाने नाव सांगाव.

**श्री. चेतन सनकत** :- एक मिनिंट तो विषयपण क्लिअर होवु द्या.

**श्री. कैलास सोनवणे** :- जो पण करत असेल त्याच्या तोंडाला डांबर लावायला पाहीजे, डांबर , किडे पडतील त्याला.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- माझ्याकडे आलेच नाही आणि मी नाही सांगीतले.

**श्री. अश्विन सोनवणे** :- नाव सांगा

**श्री. विशाल त्रिपाठी** :- कोण लिपीक आहे

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- कोण लिपीक आहे तो नावाचा विषय नाहीये.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- राजेंद्र तायडेंना मी स्वत: बोललो होतो की कुठल्याही ठेकेदाराला पावती फाडण्यापासुन तुम्ही रोखु शकत नाही.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. कैलास सोनवणे** :- पदाधिकाऱ्याचे नांव सांगा पहिले,

**श्री. मयुर कापसे :-** तायडेंना वरती बोलवायचा विषय काय आहे.

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- मला नावाचा विषय मला माहित नाहीये.

**श्री. मयुर कापसे :-** तायडेंना वरती बोलावले होते की नाही , तुमच्या समोर त्यांनी सांगीतल होत , आप्पा होते मी साक्षीला आहे ना.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- एक मिनिंट, आप्पा, एक मिनींट.

**श्री. सुनिल महाजन** :- आप्पा

**श्री. कैलास सोनवणे** :- रेकॉर्डीग आहे , रेकॉर्डीग आहे आमच्याकडे त्याची सुनिलभाऊ रेकॉर्डिंग आहे.

**श्री. मयुर कापसे :-** याला काही अर्थ आहे का, एक मिनिंट मी रेकॉर्डीग ऐकवतो

**मा.उपमहापौर** :- आप्पा मी पुराफोन करा त्यांना

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. कैलास सोनवणे** :- रेकॉर्डीग ऐकवा सगळयांना

**श्री. मयुर कापसे :-** सभागृहाला एक विनंती आहे की शांत बसा माझे संभाषण जे झाले आहे ते मी ऐकवतो.

**मा.महापौर** :- सर्वांनी खाली बसुन जावे. बाकी सर्व सन्मा.सदस्यांनी खाली बसुन जायचे आहे.

**(सभागृहामध्ये सन्मा.सदस्य. श्री. मयुर कापसे यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये असलेली रेकॉर्डीग सुरू केली व सभागृहात सर्व सन्मा.सदस्यांनी ती ऐकली अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मोबाईल मधील रेकॉर्डीग सन्मा.सदस्य.श्री. मयुर कापसे यांनी सभागृहात ऐकवली त्यात पुढील प्रमाणे सभागृहात आवाज आला :-** काय विषय आहे, तो विषय काय आहे भाऊ माहिती आहे का की हा वॉर्डाचा नंबर आहे ना तर कुलभुषणभाऊ मला बोलले होते की त्या वॉर्डाच्या पावत्या फाडायच्या आधी मला विचारायचे बुवा , कोण बोलले होते असं., कुलभुषणभाऊ बोलले होते.

**मा.उपमहापौर** :- पुर्ण ऐका

**श्री. कैलास सोनवणे** :- रेकॉर्डीग केलेली आहे, पुर्ण ऐका

**मा.उपमहापौर** :- याच क्लिरीफीकेशन मी देतो.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- याच क्लिरीफीकेशन मी देतो ऐका .

**श्री. कैलास सोनवणे** :- तुम्ही त्याठिकाणी बसायच्या लायकीचे नाहीये.

**मा.उपमहापौर** :- आप्पा ऐकुन घ्या , तुम्ही ऐकुन घ्या आधी

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही तुम्ही त्याठिकाणी बसायच्या लायकीचे नाहीये.

**मा.उपमहापौर** :- मी अस कधीच बोललेलो नाहीये की पावत्या फाडु नका असं.

**श्री. कैलास सोनवणे** :- तुम्ही सांगीतले आहे.

**मा.उपमहापौर** :- नाही आप्पा मी अस कधीच बोलला नाहीये.

**श्री. कैलास सोनवणे** :- पुर्ण ऐकवा ती रेकॉर्डींग

**मा.उपमहापौर** :- मी काय सांगतोय

**श्री. कैलास सोनवणे** :- पुर्ण ऐका ती रेकॉर्डींग

**श्री. मयुर कापसे** :- पुर्ण ऐकवतो मी रेकॉर्डींग

**श्री. कैलास सोनवणे** :- पुर्ण रेकॉर्डींग ऐका ती पुर्ण लावा ती रेकॉर्डींग

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- मी काय म्हणतोय.

**श्री. मयुर कापसे** :- पुर्ण ऐकुन घ्या एकच मिनिंट

**मा.उपमहापौर** :- एक मिनिंट, मी तुमचे बोलणे झाल्यानंतर सांगतोय काय आहे ते.

**श्री. मयुर कापसे** :- एक मिनिंट

**(सभागृहामध्ये सन्मा.सदस्य. श्री. मयुर कापसे यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये असलेली रेकॉर्डींग सुरू केली व सभागृहात सर्व सन्मा.सदस्यांनी ती ऐकली अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

रेकॉर्डींग मध्ये असे ऐकु येते ते पुढील प्रमाणे , कुलभुषणभाऊ बोलले होते की मला सांगतील की ९ नंबर आणि १० नंबर च आल की मला सांगायच अस.

**मा.उपमहापौर** :- एक मिनिंट पुर्ण ऐका ना , व्यवस्थित पुर्ण ऐका ना, पुर्ण ऐका ना

**श्री. मयुर कापसे** :- एक मिनिंट

**(सभागृहामध्ये सन्मा.सदस्य. श्री. मयुर कापसे यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये असलेली रेकॉर्डींग सुरू केली व सभागृहात सर्व सन्मा.सदस्यांनी ती ऐकली अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- आता याच्यात कुठे बोललो आहे मी की पावत्या फाडु नका.

**श्री. मयुर कापसे** :- अगोदरच्या याच्यात आहे ना

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- आता मला एक सांगा की,

**श्री.कैलास सोनवणे** :- तुम्ही मालक आहे का ?

**मा.उपमहापौर** :- मी बोललो नाहीये असं की

**श्री.कैलास सोनवणे** :- तुम्ही मालक आहे का ? महानगरपालिकेचे मालक आहे का तुम्ही

**मा.उपमहापौर** :- मी असं बोललो नाहीये , मी अस बोललेलो नाही.

**श्री.कैलास सोनवणे** :- बोलले आहे तुम्ही

**मा.उपमहापौर** :- १०० टक्के खोट आहे मी असं बोललो नाहीये

**श्री.कैलास सोनवणे** :- बोलले आहे तुम्ही

**मा.उपमहापौर** :- मी असं बोललो नाहीये

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. मयुर कापसे** :- स्पष्ट बोलले आहे नागरीकांनी

**श्री. जितेंद्र मराठे** :- त्याला बोलवा ना येथे कोण आहे तर

**श्री. मयुर कापसे** :- संबंधित लिपीकाला

**श्री. जितेंद्र मराठे** :- त्याला बोलवा ना येथे

**मा.उपमहापौर** :- जो लिगल ठेकेदार आहे आणि दुसऱ्याला पावती फाडायची होती

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. चंद्रशेखर पाटील** :- आता राजीनामा द्या.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- आप्पा साहेब मी अस बोललेलो नाही. हा जो ठेकेदार होता ना ऐकुन घ्या प्रत्यक्ष आल्यानंतर मी समोरासमोर करून देईन

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- जे ठेकेदार वर्षानुवर्ष काम करत आहे आणि ते ठेके घेताहेत आपल्या महापालिकेत त्याच्या संदर्भात आहे

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- एकच ठेकेदाराला काम द्यायची आपली मक्तेदारी आहे का ? ठेकेदारांचा मक्ता आहे कायम आपण त्यांना काम द्यायचे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.कैलास सोनवणे** :- तुम्ही बोलले आहे ना

**मा.उपमहापौर** :- आप्पा प्रुफ देतो मी , प्रुफ देतो ना

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- आता ते भरलेले टेंडर जे आहे ना त्याच्यामध्ये पी-२ चे किती टक्के अमाऊंट आहे ते विचारा, विचारून घ्या ते.

**श्री.कैलास सोनवणे** :- तो विषय नाहीये.

**मा.उपमहापौर** :- मी सांगतोय ना मी फोन त्याला याच्यासाठी लावला, मी सांगतो ना लावला ना फोन, मी सांगतो आहे, मी याच्यासाठी लावला आहे फोन.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- आप्पा

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- आप्पा मला माहिती आहे की कोण बोलले आहे आणि कोण नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** यांच्या बापाची आहे का महापालिका.

**मा.उपमहापौर :-** महापालिका माझ्या बापाची नाही तर तुमच्याही बापाची नाही.

**श्री.कैलास सोनवणे** :- मी बोलत नाही असे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.कैलास सोनवणे** :- पावत्या फाडायच्या नाही असे बोलले की नाही.

**मा.उपमहापौर** :- आप्पा मी अस कधीच बोललेलो नाहीये.

**श्री.मयुर कापसे** :- अहो प्रुफ आहे ना आमच्याकडे , नाहीतर त्या कर्मचाऱ्याला येथे बोलवा.

**मा.उपमहापौर** :- बोलवा ना.

**श्री.जितेंद्र मराठे** :- अहो बोलवा ना त्याला

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- मी हे बोललेलो नाही आहे की, अबाऊ मध्ये पावत्या फाडु नका , कशाला फाडता पावत्या परत परत तेच ठेकेदारालाच द्यायचे का दुसऱ्या भरपुर एजन्सी आहे का जळगांव शहर महानगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या ओपन होवु द्याना टेंडर , ओपन होवु द्या टेंडर महापालिकेचा फायदा होईल ना.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्यांनी घोषणाबाजी करायला सुरूवात केली त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नही चलेगी नही चलेगी दादागीरी नही चलेगी.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्यांनी घोषणाबाजी करायला सुरूवात केली त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.मयुर कापसे** :- त्या धृतराष्टाचा तपास लागलाच पाहीजे महापालिकेत

**मा.महापौर** :- सर्व सन्मा.सदस्यांनी प्लीज बसुन घ्यायचे आहे आपआपल्या जागेवर , बसुन घ्या सगळयांनी

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्यांनी घोषणाबाजी करायला सुरूवात केली त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.कैलास सोनवणे** :- महापौरताई आता मयुर भाऊंनी कथा सांगीतली ना त्याच्या पुढच थोडफार मी सांगतो आता जेव्हा धृतराष्टाची राजा बनायची ईच्छा होती ना त्यावेळेला ते शिक्षण घेवुन ते नेमके आले होते. धृतराष्ट , पांडु आणि विदुराने तर विदुराने त्याला विरोध केला होता की आणि एक अंध व्यक्ती खुर्चीवर बसु शकत नाही. तर या तुमच्या नगरसेवकांमध्ये विदुर पाहीजे. विदुर जन्माला आला पाहीजे तेव्हा हे असे बोगस लोक बसणार नाही.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- आप्पा त्याच पण उदाहरण सांगतो आता रावण कशामुळे हरला होता फक्त त्याच्या गर्वामुळे नाही तर रावणासारखे शक्तीशाली राम सुध्दा नव्हते, पण रावणाचा गर्वहरण

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- कशासाठी झाला, रावणाचा गर्वहरण कशासाठी झाला. रावणाचा वध याच्यासाठी झाला

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्यांनी घोषणाबाजी करायला सुरूवात केली तसेच सन्मा.सदस्य. श्री.विशाल त्रिपाठी हे सभागृहामध्ये त्यांच्या जागेवरून उठुन खाली येवुन बसले व त्यांनी सिया और रामचंद्र की जय अशी घोषणाबाजी करायला सुरूवात केली .सभागृहामध्ये यामुळे गोंधळ निर्माण होवुन स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी** :- यांनी खाली उतराव, मी सभागृहाला विनंती करतो की यांनी खाली उतराव.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे गोंधळ निर्माण झाला होता. तसेच मा.महापौर , मा.उपमहापौर, यांचे सोबत सन्मा.सदस्य.श्री.नितीन लढ्ढा, श्री.विष्णु भंगाळे , श्री. प्रशांत नाईक , सन्मा.सदस्या. सौ. उज्वला बेंडाळे, सौ.प्रतिभा कापसे हे व्यासपिठावर येवुन चर्चा करीत होते सदर वेळी सभागृहात काही सन्मा.सदस्य. घोषणाबाजी करीत असल्यामुळे आवाज स्पष्ट ऐकु येत नाही.)**

**मा.महापौर** :- एक मिनीट, अनिश्चित काळासाठी सभा तहकुब करण्यात येत आहे. चला **(यानंतर मा.पिठासीन अधिकारी व मा.उपमहापौर तात्काळ सभागृहातुन बाहेर निघुन गेले)**

**(सभागृहामधुन मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी , मा.उपमहापौर तसेच इतर काही सदस्य सभागृहामधुन निघुन गेले त्यामुळे सभागृहात गोंधळ निर्माण होवुन आवाज स्पष्ट ऐकु येत नाही तसेच काही सन्मा.सदस्य सभागृहामध्ये चर्चा करीत होते व बराच वेळ थांबुन त्यानंतर ते सुध्दा सभागृहातुन बाहेर निघुन गेले.)**

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**